# <u>बैठकीचे इतिवृत्त.</u>

**दिनांक १८/८/२०११ रोजी मुख्यालय, मुंबई येथे अन्न सुरक्षा व मानदे कायदा २००६ संदर्भात मा. आयुक्त ( अन्न सुरक्षा आयुक्त, महाराष्ट्र राज्य ) यांनी बोलावलेल्या बैठकीचा इतिवृत्तांत.**

**************************

सदर बैठकीस मा. अन्न सुरक्षा आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, म.रा., मा. सह आयुक्त (दक्षता ) अन्न व औषध प्रशासन, मुंबई, सह आयुक्त (अन्न) तसेच खालीलप्रमाणे सर्व विभागीय सह आयुक्त, सहायक आयुक्त (अन्न) व खालील अधिकारी उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १) श्री. ओ.शो. साधवानी | सह आयुक्त (विधी ) |
| २) श्री. स. रा. शर्मा | सह आयुक्त ( कोकण विभाग ) ठाणे. |
| ३) श्री. संजय पाटील | सह आयुक्त (पुणे विभाग ) |
| ४) श्री. सुहास चौधरी | सह आयुक्त (नाशिक विभाग ) |
| ५) श्री. अ. ता. निखाडे | सह आयुक्त (नागपूर विभाग ) |
| ६) श्री. स. मा. दलाल | सह आयुक्त (अमरावती विभाग ) |
| ७) श्री. सु. ग. अन्नपुरे, | सहायक आयुक्त (अन्न), ठाणे. |
| ८) श्री. सु. स. देशमुख | सहायक आयुक्त (अन्न) बृहन्मुंबई |
| ९) श्री. श.रा. केकरे | सहायक आयुक्त (अन्न) नाशिक |
| १०) श्री. न. र. वाकोडे | सहायक आयुक्त (अन्न) अमरावती. |
| ११) श्री. एस. के. शेरे | सहायक आयुक्त (अन्न) औरंगाबाद. |
| १२) श्री. चं. भा. पवार | सहायक आयुक्त (अन्न) |
| १३) श्री. सं. मा. देशमुख | पर्यवेक्षक (अन्न) सातारा |
| १४) श्री. एस. पी. नारागुडे | सहायक आयुक्त (अन्न) नागपूर. |
| १५) श्री. पी.एम. राऊत, | पर्यवेक्षक (अन्न), सोलापूर |
| १६) श्री. सी.डी. राठोड | अन्न सुरक्षा अधिकारी, मुख्यालय |
| १७) श्री.डी. टी संगत | पर्यवेक्षक (अन्न), वर्धा |
| १८) श्री. एस.एम. वझरकर | अन्न सुरक्षा अधिकारी, मुख्यालय |
| १९) श्री. जी. एस. परळीकर | पर्यवेक्षक (अन्न) अकोला |
| २०) श्री. के. व्ही. संखे | पर्यवेक्षक (अन्न) मुख्यालय |
| २१) डॉ. के. यु. मेथेकर | अन्न सुरक्षा अधिकारी, मुख्यालय |
| २२) श्रीमती दिप्ती हरदास | अन्न सुरक्षा अधिकारी, मुख्यालय |

१) बैठकीच्या प्रारंभी सर्व विभागीय सह आयुक्त यांना नविन कायदयाच्या अनुषंगाने लागणा-या कागदपत्रांचे संच देण्यात आले त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

अ) अन्न सुरक्षा अधिकारी, पदावधित अधिकारी, अन्न विश्लेषक, स्थानिक क्षेत्र यांची महाराष्ट्र शासनातर्फे काढलेल्या अधिसुचनांचा संच

ब) Unique Identification Number (१४ digit) बाबतचे FSSAI कडुन प्राप्त झालेले परीपत्रक.

क) अन्न नमुने काढण्यासाठी तसेच पाठविण्यासाठी लागणारी आवश्यक कागदपत्रे

ड) नियमावली अंतर्गत (Regulation) करावयाची नोंदणीसाठी लागणारा अर्ज हमीपत्र, प्रतिज्ञापत्र, नोंदणी दाखला, नोंदणी धारकांसाठी अटीचा संच

इ) परवान्यासाठी लागणारा अर्ज, हमीपत्र, कागदपत्रांची यादी, परवाना शुल्क तपशिल, परवाना व परवान्याच्या अटींचा संच

फ) देशामध्ये एकसुत्री अंमलबजावणीच्या दृष्टीने एकसारखे Record (लेखा) ठेवण्याबाबत FSSAI तर्फे प्राप्त झालेले परीपत्रक

२) बैठकीच्या सुरुवातीला सह आयुक्त (अन्न) श्री. राठोड यांनी वरील सर्व कागदपत्रांबाबत थोडक्यात माहिती दिली.

३) मुख्यालयाचे अन्न सुरक्षा अधिकारी डॉ. के. यु. मेथेकर यांनी Unique Identification Number बाबत संगणकीय सादरीकरण (Presentation) केले व त्यावर उपस्थितांमध्ये चर्चा झाली. सह आयुक्त (औरंगाबाद विभाग) श्री. थुल यांनीही UID बाबत माहिती दिली. तसेच सह आयुक्त (कोकण विभाग) श्री. शर्मा यांनी १४ digit मध्ये पदावधित अधिका-याच्या नंबर नंतर सिरीयल नंबर मधील २ digit रजिस्ट्रेशन ऑथॉरिटी चा कोड नं. ठेवावा असे सुचविले परंतु परवाना हा एक नंबरने व रजिस्ट्रेशन दोन नंबरने सुरु होत असल्यामुळे व FSSAI ने दिलेल्या निर्देशाप्रमाणेच UID नंबर दयावा लागेल असे सह आयुक्त (अन्न) यांनी सांगितले.

४) सदर बैठकीला मा. अन्न सुरक्षा आयुक्तांच्या निर्देशानुसार NIC पुणे येथील अधिकारी श्री. गोडबोले व त्यांचे सहकारी उपस्थित होते. त्यांनी सदर प्रकरणी मार्गदर्शन दिले. त्यानुसार पदावधित अधिका-यांचे स्थानिक क्षेत्र वाटप करताना महसुली विभागानुसार करणे आवश्यक नसुन मा. अन्न सुरक्षा आयुक्त प्रशासनाच्या सोईनुसार स्थानिक क्षेत्र ठरवतील व हे ठरवलेले क्षेत्र नियमानुसार ग्राहय ठरेल.

५) श्री. गोडबोले यांनी पदावधित अधिकारीचे नंबर राखीव ठेवता येणार नाही असे स्पष्ट केले. मा.अन्न सुरक्षा आयुक्त यांनी प्रशासनाने ६२ पदावधित अधिकारी करावयाचे ठरविले आहे. तसा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहे. त्यामुळे प्रशासनात सध्या कार्यरत असलेले पदावधित अधिकारी यांना क्रमांक दयावे व त्यानंतर जी पदे मंजुर होतील त्यांना पुढील क्रमांक दयावेत असे निर्देश दिले.

६) मा. अन्न सुरक्ष आयुक्त यांनी सध्या जरी प्रत्येक जिल्हयाला १ ते २ रजिस्ट्रेशन ऑथॉरिटी नेमण्याचे धोरण आहे तथापि कामाचे स्वरुप व व्याप वाढल्यानंतर सर्व अन्न सुरक्षा अधिका-यांना रजिस्ट्रेशन ऑथॉरिटी म्हणुन नेमण्यात येईल.

७) मा. अन्न सुरक्षा आयुक्त यांनी या कायदयान्वये देण्यात येणारे नोंदणी व परवाने संगणकावरच तयार व्हावेत हे आग्रहपुर्वक सांगितले व त्या कामासाठी श्री. थुल सह आयुक्त (औरंगाबाद विभाग) व पर्यवेक्षक (अन्न) श्री राऊत व श्री. देशमुख यांची श्री. गोडबोले यांना मदत करण्यासाठी नियुक्ती केली व सदर Software लवकरात लवकर तयार करण्याबाबत निर्देश दिले.

८) श्री. थुल सह आयुक्त (औरंगाबद विभाग) यांनी अर्ज आल्याबरोबर त्याला क्रमांक दयावा अशी सुचना केली असता, श्री. राठोड सह आयुक्त (अन्न) यांनी अशी तरतुद नसल्याचे स्पष्ट केले.

९) मा. अन्न सुरक्षा आयुक्त यांनी अर्ज आल्यानंतर तपासणी झाल्यावर अन्न व्यवसायिकाला तात्पुरते  पत्र दयावे व Software तयार झाल्यानंतरच नोंदणी/परवाना क्रमांक मिळेल असे कळवावे अशा स्पष्ट सुचना दिल्या.

१०) श्री. थुल सह आयुक्त (औरंगाबद विभाग) यांनी आलेला प्रत्येक अर्ज Scan करुन संगणकात Save करावे असे सुचविले. त्यावर श्री. गोडबोले यांनी E-Filing बददल माहिती दिली तथापि त्यासाठी वेळ लागेल असे सांगितले.

११) सह आयुक्त (अन्न) श्री. राठोड यांनी नोंदणीसाठी लागणा-या कागदपत्रांबाबत तपशिलवार विवेचन केले.

१२) मा. अन्न सुरक्षा आयुक्तांनी परवान्यासाठी लागणा-या कागदपत्रांबाबत चर्चा केली व सध्या नियमात आवश्यक असणा-या कागदपत्रांनुसारच अर्ज स्विकारावेत असे सांगितले सहाय्यक आयुक्त (अन्न) श्री. देशमुख यांनी बीएमसी चे NOC मिळणे अत्यंत अवघड आहे असे सांगितले त्यावर मा. आयुक्तांनी अन्न व्यवसयिकांच्या संघटनांनी याबाबत दाद मागावी असे सांगितले.

१३) नविन कायदयांतर्गत तपासण्या कराव्यात Improvement Notice दयाव्यात त्यासाठी प्रशासनाने Expert Consultment एक वर्षाकरीता नियुक्त केलेले असुन त्यांना विभागीय सह आयुक्तांनी त्यांच्या सोईनुसार मार्गदर्शन घ्यावे.

१४) मा. अन्न सुरक्षा आयुक्तांनी अन्न पदार्थ विक्रेत्यांना विनापरवाना व्यवसाय करता येणार नाही याबाबत सर्व संघटनांना जाणीव करुन द्यावी असे सांगितले.

१५) नविन नियमानुसार खुले खाद्यतेल विकता येणार नाही असे नमुद आहे. त्यावर चर्चा झाली. सहाय्यक आयुक्त (अन्न) नागपुर श्री. नारागुडे यांनी Resale साठी पॅकिंग मध्ये तेल विकणे आवश्यक असुन Consumer साठी नाही असे सांगितले. मा. अन्न सुरक्षा आयुक्तांनी सदर विषयावर खाद्यतेल विक्रेत्यांची २४/०८/२०११ रोजी बैठक आयोजित केली असुन, त्यामध्ये याबाबत चर्चा होईल व सर्व सह आयुक्तांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील खाद्यतेल विक्रेत्यांना सदर बैठकीस उपस्थित राहण्याविषयी कळवावे असे सांगितले.

तसेच मसाले व मसाल्याचे पदार्थ उत्पादक, किरकोळ विक्रेते, हॉटेल व्यवसायिक यांच्याही बैठका आयोजित करण्याचे ठरले.

१६) श्री. थुल सह आयुक्त (औषधे विभाग) यांनी गुटख्याबाबत काय कारवाई करावी असे विचारले असता सहाय्यक आयुक्त (अन्न) श्री. देशमुख यांनी सदर प्रकरणी न्यायालयात प्रलंबित असलेल्या अर्जावर मा. उच्च न्यायालय दि. २९/०८/२०११ रोजी निर्देश देणार आहेत व त्यानंतर कारवाईची रुपरेषा ठरवणे योग्य होईल असे सांगितले.

१७) मा. अन्न सुरक्षा आयुक्त यांनी सर्व ठिकाणी अन्न व्यवसायिकांच्या कार्यशाळा घेऊन व सर्व संघटनांना पत्रे देऊन कायदयातील नविन तरतुदींबाबत जाणीव करुन दयावी असे सांगितले.
१८) सदर कायदयाची संपुर्ण देशात एकछत्री व एकसुत्री अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने FSSAI ने दिलेल्या निर्देशानुसार सर्व Record English मध्ये ठेवावे अशा सुचना मा. अन्न सुरक्षा आयुक्तांनी दिले.

१९) अन्न सुरक्षा अधिकारी म्हणुन दयावयाचे ओळखपत्र पुर्ण महाराष्ट्रात एकसारखे रहावे म्हणुन मुख्यालयातर्फे मसुदा देण्यात येईल असे सह आयुक्त (अन्न) यांनी सांगितले.

२०) मा. अन्न सुरक्षा आयुक्तांनी नविन कायदयांतर्गत किती नमुने काढले असे विचारले असता पर्यवेक्षक (अन्न) सातारा श्री. देशमुख यांनी ०४ अन्न नमुने घेतले असे सांगितल्यावर मा. अन्न सुरक्षा आयुक्तांनी त्यांचे अभिनंदन केले. श्री. देशमुख यांनी पुणे प्रयोगशाळेचे नमुने तपासणीसाठी न पाठवण्याबददल पत्र आले असुन त्यामुळे पुढे काय करावे असे विचारले. सह आयुक्त (अन्न) यांनी सदर पत्र मुख्यालयालाही प्राप्त झाले असुन अन्न भेसळ प्रतिबंधक कायदयातील नमुने तपासणी बाकी असल्यामुळे नमुने पाठवु नयेत असे पत्र प्राप्त झाले आहे असे सांगितले. त्यावर सध्या नमुने मुंबई येथे प्रयोगशाळेकडे पाठवावे अशा सुचना मा. अन्न सुरक्षा आयुक्तांनी दिल्या. तसेच त्यांनी नविन नियमांतर्गत पाठविण्याचा नमुन्याचा चौथा भाग

इतर आरोग्य विभागातील प्रयोगशाळांकडे पाठवावा, त्याचे शुल्क नियमन २.३.१ (४) मध्ये नमुद केलेले आहे. (रु. १०००/- फक्त)

२१) नविन कायदयानुसार तत्काळ सर्व कामे चालु करण्यात यावी असे आदेश मा. अन्न सुरक्षा आयुक्त यांनी दिले व सर्व अन्न सुरक्षा अधिका-यांच्या कामकाजाचा आढावा मा. अन्न सुरक्षा आयुक्त स्वत:हा पुढील बैठकीत घेतील असे सांगण्यात आले.

आभार प्रदर्शनाने बैठक संपविण्यात आली.